**प्रेसनोट दि. २३/०३/२०२४**

**'जगद्‌गुरु संत श्री तुकाराम महाराज बीज उत्सव' सोहळ्याचे अनुशंगाने पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेमार्फत करण्यात आलेले वाहतुकीचे नियोजन व तयारी**

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील देहु येथील जगद्‌गुरु संत श्री तुकाराम महाराज बीज उत्सव दिनांक २७/०३/२०२४ रोजी साजरा होत असून सदर सोहळ्याकरीता देहूगाव मध्ये २ दिवस आगोदरपासुनच वारकरी सांप्रदायातील वारकरी, भाविक, माता भगिनी या देहूगाव येथे कुटुंब परिवारासह खाजगी तसेच सार्वजनिक वाहनांनी येत असतात. सदर बीज सोहळ्यावेळी देहुगाव परिसरात वाहनांची गर्दी होवून भाविकांना जागा अपुरी पडत असल्याने सदर वेळी वारकऱ्यांच्या दिंडीची वाहनांची पार्किंग व्यवस्था तसेच बीज उत्सवावेळी देहुगावात भाविकांचा वावर हा सोयीस्कर व मोकळा होणे आवश्यक असतो. सदर सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस कटिबध्द असुन सदर बीज उत्सवाचे अनुषंगाने पुढीलप्रमाणे वाहतुकीचे नियोजन व तयारी करण्यात आलेली आहे.

बीज उत्सव सोहळा निर्वीघ्नपणे पार पाडणेकरता व वाहतुक सुरळित विनाअडथळा पार पाडणे व देहूगावातील इतर दळणवळण सुव्यवस्थीत चालु ठेवणेकरीता खालील मार्गावरील वाहतुक वळविणे गरजेचे असल्याने इकडील कार्यालयीन जावक क्र पोउआ/वाहतुक/नियोजन/८३५९२८/२०२४ दिनांक २२/०३/२०२४ अन्वये दिनांक २५/०३/२०२४ रोजी १२.०० ते दिनांक २७/०३/२०२४ रोजी २१.०० वाजेपावेतो वाहतुक बदलाची अधिसुचना प्रसारीत करण्यात आलेली असुन सदर डायव्हर्शनकरीता १९५ बॅरिकेट्स, २५ दोर, ०३ टोईंग व्हॅनचा वापर करण्यात येत आहे. वाहतूक बदल केलेले ठिकाणे खालीलप्रमाणे

१) देहुगाव कमान (जुना मुंबई-पुणे हायवे) येथुन देहुगाव कडे येणाऱ्या सर्व वाहनासाठी रस्ता बंद राहील.(सार्वजनिक वाहतुक बसेस व दिंडीतील वाहने वगळून )

२) महिंद्रा सर्कलकडुन फिजुत्सु कॉर्नर अथवा कॅनबे चौक/आयटी पार्क चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत असुन सदर मार्गावरील वाहने महिंद्रा सर्कल ते निघोजे ते मोईफाटा मार्गे डायमंड चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

३) तळेगाव-चाकण रोडवरील देहुफाटा येथुन देहुगाव जाणारे रस्त्यावरुन सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असून सदर मार्गावरील वाहने एच.पी.चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

४) नाशिक पुणे हायवेवरील चाकण तळेगाव चौक तसेच स्पायसर चौक येथुन महिंद्रा सर्कल मार्गे आयटी पार्क /कॅनबे चौक जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असून सदर मार्गावरील वाहने हि मोशी भारतमाता चौक मार्गे तसेच महिंद्रा सर्कल-इंड्युरन्स चौक-एच पी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील

५) देहु कमान ते १४ टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद राहील.

६) खंडेलवाल चौक ते देहुकमान (मुख्य) ते परंडवाल चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद राहील

७) जुना पालखी मार्ग (कंद पाटील चौक) ते झेंडे मळा (जकातनाका) जाणारी वाहतुक वन-वे (एकदिशा मार्ग) करण्यांत येत आहे.

तसेच पुणे, भोसरी, आळंदी, चिखली, निगडी येथुन तळवडे मार्गे देहूगाव येथे येणाऱ्या भाविक/वारकरी वाहनांकरीता देहूगाव येथील गायरान येथे पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे पुणे मुंबई जुन्या हायवेवरून देहूकमान मार्गे येणाऱ्या भाविकांचे/वारकऱ्यांचे वाहनांकरीता सी.ओ.डी मैदान (राधा कृष्ण मंगल कार्यालय जवळील) येथे पार्किंगची सोय करण्यात आलेली आहे. चाकण तळेगाव देहूफाटा येथून देहूगावाकडे येणाऱ्या भाविकांचे/वारकऱ्यांची वाहनांसाठी सप्तपदी लॉन्स व भागिरथी लॉन्स येथे पार्किंगची सोय करण्यात आलेली आहे.

जगद्‌गुरु संत श्री तुकाराम महाराज बीज उत्सवाकरीता पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेकडील १ पोलीस उप आयुक्त, ०२ सहाय्यक पोलीस आयुक्त, ०६ पोलीस निरीक्षक, १२ सपोनि/पोउनि, १२८ पोलीस अंमलदार व ३५ वार्डन असा वाहतूक विभागाकडुन बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

तरी भाविकांनी सदर बीज उत्सव सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे वाहतुक शाखेमार्फत करण्यात आलेल्या वाहतुक डायव्हर्शनचे पालन करुन वाहतुक शाखेस सहकार्य करावे असे अवाहन नागरीकांना पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेमार्फत करण्यात येत आहे.

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी-चिंचवड